
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 AUG 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ध्वजवंदनप्रसंगी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासमवेत अधिकारी.

## शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात ७८ वा स्वातंत्र्य दिन रॅली, सेल्फी पॉईंटस् आदी उपक्रमांसह मोठ्या उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणात राष्ट्रध्वजास वंदन करण्यात आले. राष्ट्रीय छात्र सेनेने राष्ट्रध्वजास सलामी दिली. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी फ्लॅग-ऑफ करून रॅलीत सहभाग घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 AUG 2024 लोकमत

# विद्यापीठात रॅली, सेल्फी पॉइंट्स

## स्वातंत्र्य दिन उत्साहात : अधिकारी, विद्यार्थ्यांची उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात ७८ वा स्वातंत्र्य दिन गुरुवारी रॅली, सेल्फी पॉइंट्स आदी उपक्रमांसह मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणात स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रध्वजास वंदन करण्यात आले.

राष्ट्रीय छात्र सेनेच्या परेडद्वारे राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली. यावेळी राष्ट्रगीत व विद्यापीठ गीत यांचे सामूहिक गायन करण्यात आले. त्यानंतर सर्व मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील विविध ठिकाणी



शिवाजी विद्यापीठात आयोजित स्वातंत्र्यदिन रॅलीत कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के व प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, डॉ.व्ही.एन. शिंदे यांनी सहभाग घेतला.

सेल्फी पॉइंट्सवर छायाचित्रे घेण्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनीसह शिक्षक, अधिकारी आणि प्रशासकीय सेवकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यावेळी अधिकारी, विद्यार्थ्यांनी परिसरातून रॅली काढली होती.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. सागर डेळेकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 AUG 2024
सकाळ

## शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात ७८ वा स्वातंत्र्यदिनी गुरुवारी रॅली, सेल्फी पॉइंट आदी उपक्रमांसह मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी आठ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणात राष्ट्रध्वजास वंदन करण्यात आले. राष्ट्रीय छात्र सेनेच्या परेडद्वारे राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली. यावेळी राष्ट्रगीत व विद्यापीठ गीत यांचे सामूहिक गायन करण्यात आले. त्यानंतर सर्व मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. स्वातंत्र्यदिन रॅलीस कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी 'फ्लॅग-ऑफ' करून ते रॅलीमध्ये सहभागी झाले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, सरिता ठकार, सागर डेळेकर, प्रकाश गायकवाड, तानाजी चौगुले, धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, रामचंद्र पवार, स्वागत परूळेकर, वसंत एकले आदी उपस्थित होते. दरम्यान, आझादी का अमृतमहोत्सव उपक्रमांतर्गत उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉइंटवर विद्यार्थ्यांनी गर्दी केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 AUG 2024

लोकमत

# कम्युनिटी रेडिओ दुवा म्हणून काम करेल

## डॉ. डी. टी. शिर्के : शिवाजी विद्यापीठात 'शिववाणी' कम्युनिटी रेडिओचे लोकार्पण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि समाज यांच्यामध्ये कम्युनिटी रेडिओ दुवा म्हणून काम करेल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरूवारी व्यक्त केला. विद्यापीठाच्या 'शिववाणी' या कम्युनिटी रेडिओचे लोकार्पण कुलगुरू प्रा. शिर्के यांच्या हस्ते झाले.

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीमध्ये हा समारंभ झाला. कम्युनिटी रेडिओ ८९.६ मेगाहर्टसवर ऐकायला मिळणार आहे. पहिल्या टप्प्यात सकाळी ८ ते ९ आणि सायंकाळी ६ ते ७ असे प्रसारण होणार आहे. प्रा. शिर्के म्हणाले, लोकांनी लोकांसाठी चालवलेले माध्यम म्हणून कम्युनिटी रेडिओकडे पाहिले जाते. विद्यापीठाबद्दल लोकांच्या भावना अतिशय चांगल्या आहेत. रेडिओच्या माध्यमातून समाजाशी नव्याने जोडता येणे शक्य आहे. संशोधन, लोकविद्या, लोकसंस्कृती समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी रेडिओचा उपयोग होईल. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखा अधिकारी सुहासिनी पाटील, प्रा. डॉ. एस. एस. महाजन, प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, अजितसिंह जाधव, प्रा. डॉ. डी. एस. डेळेकर, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. शिवाजी जाधव, आर. जे. अभिजीत, आर. जे. कल्याणी, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या 'शिववाणी' या कम्युनिटी रेडिओचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. शरद बनसोडे, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. प्रमोद पाटील, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. अजितसिंह जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. एम. एस. महाजन, डॉ. शिवाजी जाधव, प्रा. एस. एस. महाजन, प्रा. सागर डेळेकर,आदी उपस्थित होते.